**SNJB's**
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

# NATIONAL SERVICE SCHEME (NSS)
## (D-SF-106)

| 2016-2017 | |
|---|---|
| **Date** | **Activity** |
| **21/06/2016** | International Yoga Day |
| **01/07/2016** | Tree Plantation |
| **01/09/2016** | Dengue Awareness Rally |
| **20/09/2016** | Swacch Bharat Abhiyan |
| **25/09/2016** | World Pharmacist Day Celebration |
| **10/01/2017 to 16/01/2017** | NSS Special Winter Camp at Mangrul |
| **Grants / Funds received from University: 25,250/-** | |

## NSS Unit Approval Letter from University 2016-17

D
SF-106

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. संजयकुमार दळवी
एम.एससी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८५००१४४६६

संदर्भ : रासेयो/३४५/२०१६

SSDJ College of Pharmacy,Chandwad
Recieved on Date: 15/9/2016
Inward No. 23

दि. ०९/०९/२०१६

प्रति
**मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी**
**एस.एन.जी.बी.चे श्रीमान सुरेशदादा जैन**
**कॉलेज ऑफ फार्मसी**
**नेमीनगर, चांदवड, नाशिक ४२३ १०१.**

**विषय : सन २०१६–२०१७ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एकक मंजूरीबाबत...**

मा. महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात आनंद होतो की, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी आपल्या महाविद्यालयास आपल्या मागणीनुसार रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक ५० **(पन्नास)** संख्येचे **स्वयंनिर्वाह एकक** मंजूर करण्यात येत आहे. याकरीता आपल्या महाविद्यालयास रु. २१०/- प्रती विद्यार्थी X ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्या =रू. १०५००/– या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

स्वयंनिर्वाह एककाअंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराचे आयोजन करणे अनिवार्य राहील. स्वयंनिर्वाह एककाचा स्वतंत्र हिशोब रासेयो कार्यालयाला माहे मार्च २०१७ मध्ये केंद्रिय लेखा परिक्षणावेळी लेखे सादर केल्यानंतर मंजूर अनुदान आपल्या महाविद्यालयास अदा करण्यात येईल. या संदर्भातील सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर स्वयंनिर्वाह एकक असा स्पष्ट उल्लेख असावा. स्वयंनिर्वाह एकका संदर्भातील सर्वप्रकारची कागदपत्रे स्वतंत्र ठेवण्यात यावीत (मान्यता पत्र, शिबीर प्रस्ताव, विद्यार्थी यादी, धनाकर्ष).

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे SC-11.8%, ST-9.4% व Other-78.8% यानुसार रासेयोमध्ये स्वयंसेवकांचे प्रवेश करणे आवश्यक आहे. (अल्पसंख्यांक विद्यार्थी संख्या स्वंतत्ररित्या नमुद करणे) प्रवर्गनिहाय संख्येनुसार विद्यापीठामार्फत रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रमाचे अनुदान उपलब्ध होणार आहे याची कृपया नोंद घ्यावी.)
२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवु नये. अतिरीक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.
३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची (अल्फाबेटीकल) वर्गनिहाय व प्रवर्गानुसार (SC, ST, OTHER, Minority प्रमाणे) यादी Online करुन रासेयो कार्यालयास जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परिस्थितीत बदल करू नये.)
४. रु.१०/-प्रमाणे (प्रति विद्यार्थी X रासेयो विद्यार्थी संख्या) 'मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे' (Finance & Account Officer, SPPU, Pune) यांचे नावे धनाकर्ष काढून तसेच नियमित राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा व विद्यार्थी यादी दि. २० सप्टेंबर, २०१६ पर्यंत रासेयो कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.
५. मासिक अहवाल (Monthly Report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठविणे बंधनकारक आहे. एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ पर्यंत (नमुना सोबत जोडला आहे.)
५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (www.unipune.ac.in/nss) या एन.एस.एस. वेबसाईटवर वेळोवेळी परिपत्रके प्रसिद्ध केली जातील. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम आयोजित करुन सदर अहवाल, छायाचित्र इ. रासेयो कार्यालयास सादर करावे, ही विनंती.

कळावे, धन्यवाद !

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी हिशोबासोबत मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

**Website :** http://www.unipune.ac.in/nss **Email :** nss@pun.unipune.ac.in, nss@unipune.ac.in

**SNJB's**
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR*,**
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

ESTD - 1928

## NSS Program Officer (PO) Approval Letter from University 2016-17

D
SF-106

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. संजयकुमार दळवी
एम.एस्सी.,पीएच.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९०३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९०३४१
मोबाईल : ९८५००१४४६६

संदर्भ : रासेयो/३४६/२०१६

दि. ०९/०९/२०१६

प्रति,
मा.प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी
एस.एन.जी.बी.चे श्रीमान सुरेशदादा जैन
कॉलेज ऑफ फार्मसी
नेमीनगर, चांदवड, नाशिक ४२३ १०१.

**विषय : सन २०१६–१७ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मान्यतेबाबत....**

मा. महोदय/महोदया,

आपण पाठविलेल्या राष्ट्रीय सेवा योजना एकक मान्यता प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयातील खालील प्राध्यापकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता असून पुढील वर्षी नव्याने मान्यता घेण्यात घ्यावी.

रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना मान्यता मिळाल्यापासून सहा महिन्यांच्या आत 'ETI, अहमदनगर' येथे ओरिएंटेशन प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. कार्यक्रम अधिकारी यांना मान्यता मिळाल्यानंतर त्यांनी ३ वर्षे राष्ट्रीय सेवा योजनेचे काम केले पाहिजे. तसेच ३ वर्षाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्र, ओरिएंटेशन प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व कार्यक्रम अधिकारी कालावधीतील केलेल्या कामाचा संक्षिप्त समाधानकारक अहवाल सादर केल्यानंतरच विद्यापीठाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रमाणपत्र (Appreciation Certificate) देण्यात येईल. राष्ट्रीय सेवा योजना सन २०१६-१७ नियमित कार्यक्रमांचा मासिक, तिमाही, सहामाही व वार्षिक अहवाल व विशेष शिबीराचा अहवाल दिलेल्या वेळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकाऱ्यांची राहिल. रासेयो विभागाने नियुक्त केलेल्या जिल्हा व विभाग समन्वयक यांना आपल्या महाविद्यालयातील रासेयो एकका विषयी वेळोवेळी माहिती देणे आवश्यक राहील. (विद्यार्थी यादी, अहवाल, उपक्रम इ.)

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध शिबीरे/स्पर्धांकरीता संघनायक म्हणून विद्यापीठाने नेमणूक केल्यास सदर शिबीर/स्पर्धांकरीता आपल्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांना 'संघनायक' म्हणून आपले योगदान देणे गरजेचे असेल. आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे कार्यरत आहे, त्याबद्दल आपणांस मनस्वी धन्यवाद !

१. प्रा. विजय शामरावजी बारकर
२.
३.

SSDJ College of Pharmacy,Chandwad
Recieved on Date: 15/9/2016
Inward No. 23

15/9/16

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरीता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

**SNJB's**
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

ESTD - 1928

## NSS Letter for Winter Special Camp from University 2016-17

DSF-106

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/४२०/२०१६

दि. २४/११/२०१६

प्रति
**मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी**
**एस.एन.जी.बी.चे**
**श्रीमान सुरेशदादा जैन कॉलेज ऑफ फार्मसी**
**नेमीनगर, चांदवड,**
**नाशिक ४२३ १०१.**

**विषय : २०१६–२०१७ राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर मान्यते बाबत ...**

मा. महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आपल्या महाविद्यालयास सन २०१६–१७ वर्षातील विशेष शिबिराकरीता २५ (अक्षरी– **पंचवीस** ) विद्यार्थी संख्या मान्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार विशेष शिबिर आयोजनास आपल्या महाविद्यालयास रु. ५९०/– प्रती विद्यार्थी X २५ विद्यार्थी संख्या= रू. १४७५०/– अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. यापैकी विद्यार्थी संख्या २५ X रू. ३००/– प्रमाणे प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येईल.

आपल्या प्रस्तावास अनुसरुन रासेयो विशेष शिबिरास दि. ०९ / ०१ /२०१७ पासून १५ / ०१ /२०१७ पर्यंत स्थळ मु. मंगरूळ ता. चांदवड जि. नाशिक या ठिकाणी आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान'** या संकल्पनेनुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे निर्गमीत केलेले उपक्रम राबविताना रासेयो विभागाच्या संदर्भ : रासेयो/६७१/२०१५, दि. १७ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. **त्याचप्रमाणे किमान सलग तीन (३) वर्षे वरील नमुद केलेले गाव दत्तक घेणे** व गावामध्ये नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

याकरीता सरपंच, पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, तलाठी व तहसीलदार इ. शासकीय अधिकारी/यंत्रणा यांची मदत घ्यावी. तसेच विद्यार्थी स्वयंसेवक व स्थानिक गावकरी यांच्या एकत्रित सहकार्याने विविध प्रकारचे उपक्रम स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान अंतर्गत रासेयो विशेष शिबिराच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात व्हावेत ही अपेक्षा आहेत. शिबिरास वर्तमानपत्र तसेच इतर माध्यमातून योग्य त्या सदरातून प्रसिद्ध द्यावी.

शिबीराचे हिशोब केंद्रीय पद्धतीने सादर करावेत. हिशोबाच्या कागदपत्रांबरोबर 'ब' फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. शिबिरानंतर सविस्तर अहवाल १० दिवसांच्या आत पाठवावा. त्यासोबत शिबिरातील उपक्रमाची छायाचित्रे, बातमी व कात्रणे पाठवावीत. शिबिर अहवालासोबत शिबिरात केलेल्या श्रमदानाचे मूल्यमापन करुन पाठवावे. योग्य त्या अधिकाऱ्यांच्या (सरपंच/तहसिलदार/गटविकास अधिकारी) दाखला जोडावा. त्यात केलेल्या कामाचा अंदाजे खर्च नमूद करावा. केंद्रिय लेखापरिक्षणाच्या वेळी हिशोबासोबत सदर मान्यतापत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**आपणास शिबिरासाठी हार्दिक शुभेच्छा !**

कळावे, धन्यवाद !

National Service Scheme
Pune-7.
Savitribai Phule Pune University

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना



**Tree Plantation**



**Swacch Bharat Abhiyan**



**Swacch Bharat Abhiyan**




**Dengue Awareness Rally**




**Winter Special Camp at Mangrul**

## मंगरूळ येथे मंगळवारपासून फार्मसी महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिर

**चांदवड |** येथील श्रीमान सुरेशदादा जैन औषधनिर्माण महाविद्यालयाच्या विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन मंगरूळ येथे दि. १० ते १६ जानेवारी या कालावधीत करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. सी. डी. उपासनी यांनी दिली. या शिबिरात स्वच्छता अभियान, वृक्षलागवड, आरोग्य जनजागृती आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच शासकीय सवलती, भारतीय संविधान, जेनेरिक मेडिसीन, आरोग्य जनजागृती, डिजिटल अर्थव्यवस्था, व्यसन आणि आरोग्य आदी विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. या शिबिराचे नियोजन प्रा. विजय बोरकर, प्रा. डॉ. मयूर चोरडिया यांनी केले आहे.

**SNJB's**

**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**

**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***

**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

# फार्मसी महाविद्यालयाचे मंगरुळला शिबिर

चांदवड : येथील एसएनजेबीचे सुरेशदादा जैन फार्मसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्‌घाटन मंगरुळ येथे संपन्न झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त जवाहरलाल आबड होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी डॉ. सुनील धांडे होते. डॉ. धांडे यांनी शासनाच्या विविध योजना व विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. चटपल्लीवार, कार्यक्रम अधिकारी विजय बोरकर, डॉ. मयूर चोरडिया, नयना बस्ते, सोसायटीचे माजी सभापती विजय जाधव, प्रकाश शेळके, ग्रामसेवक सूर्यवंशी, मंगरुळ विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील देशमुख, शरीफ शेख आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रा.विजय बोरकर यांनी प्रास्ताविक केले. नयना बस्ते यांनी तर सूत्रसंचालन केले. डॉ. मयूर चोरडिया यांनी आभार मानले. (वार्ताहर)



चांदवड तालुक्यातील मंगरुळ येथे फार्मसी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरास मार्गदर्शन करताना संस्थेचे विश्वस्त जवाहरलाल आबड, गटविकास अधिकारी डॉ. सुनील धांडे, विजय जाधव, प्रकाश शेळके, सुनील देशमुख, विजय बोरकर, नयना बस्ते, डॉ. मयूर चोरडिया, शरीफ शेख, चटपल्लीवार, सूर्यवंशी आदि.



मंगरूळ : येथे जैन फार्मसी कॉलेजच्या हिवाळी शिबिरात बोलताना शिरीषकुमार कोतवाल. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे.

# फार्मसी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप

चांदवड, ता. २० : येथील एस.एन.जे.बी. संचालित सुरेशदादा जैन कॉलेज ऑफ फार्मसी व सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगरूळ (ता. चांदवड) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर झाले. समारोपासाठी आमदार डॉ. राहुल आहेर, माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल प्रमुख पाहुणे होते. या वेळी माजी आमदार कोतवाल, प्राचार्य डॉ. सी. डी. उपासनी यांनी विद्यार्थ्यांशी हितगूज साधताना ग्रामीण भागातील स्वच्छता, शेती, आरोग्य, शेतीत बेसुमार वापरल्या जाणाऱ्या औषधांचा शेतमालाबरोबर मानवी आरोग्यावर झालेला परिणाम याबाबत साधकबाधक चर्चा केली.